<u>नि. फौ. ख. क्र.८०/२०१६</u> निशाणी ५२

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.७ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – नंदु सिताराम शेगोकार

वय – ५२ वर्षे, व्यवसाय – मजुरी

पत्ता – रा. डाबकी रोड, अकोला, ता. जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. दि.१३.०२.२०१६ रोजी मी कारंजा रमजानपुर, निंबा फाटा येथे रहिवासी होतो. त्या दिवशी प्रकाश शेगोकार यांच्या मुलीचे लग्न मी राहत असलेल्या गावामध्ये होते. तेथे दुपारी १ ते १.३० वा. सुमारास पानेरीचा कार्यक्रम सुरु होता. त्यावेळी तेथे श्रीकृष्ण शेगोकार हे तेथे आले व त्यांनी प्रकाश शेगोकार यास विचारणा केली की, त्यास लग्नाची पत्रीका दिली नाही. प्रकाश शेगोकार यांनी त्याच्याकडे लक्ष दिले नाही. श्रीकृष्ण शेगोकार याने त्याच्यासोबत लोखंडी घन किंवा हातोडा आणलेला होता, तो श्रीकृष्ण शेगोकार याने प्रकाश याच्या मानेच्या खाली पाठीवर मारला. त्यावेळी प्रकाश यास चक्कर आली व तो खाली पडला. त्या दरम्यान प्रकाश यांची पत्नी ही त्या ठिकाणी आली तिची गच्ची श्रीकृष्ण शेगोकार याने पकडली व तिला पाठीमागे लोटून दिली व दोघांनाही जिवे मारण्याची धमकी दिली. प्रकाश शेगोकार यांना आम्ही वैद्यकीय उपचाराकरीता निंबा फाटा येथे घेवून गेलो. त्यानंतर प्रकाश शेगोकार हे पो.स्टे. येथे गेले व सदर घटनेची माहिती पोलीसांना दिली.

२. आरोपीने ज्या घनाने प्रकाश यास मारहाण केली तो मी पाहिल्यास ओळखू शकतो. आता न्यायालयात लोखंडी पाईप असलेला लोखंडी हातोळा त्यावर पंचांच्या सहीचे कागदी लेबल लावलेला मुद्देमाल न्यायालयामध्ये सादर करण्यात आला. त्यास आर्टीकल अ देण्यात आलेले आहे. सदर हातोळा हा तोच आहे. श्रीकृष्ण शेगोकार आज न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए. जी. अवातिरक यांचे मार्फत उलटतपासः</u>**

३. सदर प्रकरणातील फिर्यादी हा माझा सख्खा भाऊ आहे. त्या दिवशी लग्नाच्या पानेरीच्या कार्यक्रमाकरीता गावातील लोक, मुलाकडील व मुलीकडील सर्व नातेवाईक जमलेले होते. त्यामुळे त्या ठिकाणी लोकांची गर्दी जमलेली होती. आता मला आर्टीकल अ कडील मुद्देमाल हातामध्ये देण्यात आला, त्याचे वजन १०–१५ किलो आहे, हे म्हणणे खरे नाही. सदर लोखंडी हातोळीचे वजन ७–८ किलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, हातोळा जास्त वजनाचा असल्याने तो लोकांच्या गर्दीमध्ये मारता येवू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल अ कडील मुद्देमाल हा मंडप ठोकणारे लोक वापरतात तसेच लोहार व इतर लोक देखील वापरतात. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात मारहाण झाल्याबाबतची सांगितलेली घटना त्या दिवशी घडलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल अ कडील लोखंडी हातोळा हा माझ्या भावाच्या मुलीच्या लग्न मंडप वाल्यांचा होता व तो आम्ही पोलीसांना दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा भाऊ प्रकाश व आरोपी यांच्यामध्ये आधीपासून वाद होते म्हणून माझ्या भावाने आरोपी विरुध्द खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी हा माझा भाऊ असल्याने मी आरोपी विरुध्द खोटी साक्ष दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझी चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– ०६.११.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.11.06 17:35:36 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | ०६/११/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | ०६/११/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | ०६/११/२०२५ |